महाराष्ट्र शासन
**सहसंचालक (उच्च शिक्षण)**
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com
दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स क्र. ०२० - २६०५१६३२

जा.क्र.शि.ससं/उशि/पुवि/२०२०-२१/1748 दिनांक – २२-६-२०२१

**परिपत्रक -**

प्रति,

कुलसचिव/संचालक,

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गणेशखिंड, पुणे
२. डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे
३. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्राचार्य,

सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व
शारीरिक शिक्षण शास्त्रे महाविद्यालय
पुणे/अहमदनगर/नाशिक

विषय - सेवानिवृत्ती प्रकरणांबाबत .. .. ..

उपरोक्त विषयी, या परिपत्रकाद्वारे आपणांस अवगत करण्यांत येते की, आपल्या विद्यापीठ/महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील सेवानिवृत्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवानिवृत्ती वेतन /कुटूंब निवृत्ती वेतन प्रकरणे प्रस्तुत कार्यालयामध्ये सादर करतांना असे निदर्शनास आलेले आहे की, अती प्रदान वसूलीचे तक्ते काळजीपूर्वक तपासले जात नाहीत.

सदर महाविद्यालयातील सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे सादर करतांना मा. लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान पुणे विभाग यांनी वेतन निश्चीती तपासून अंतिम वेतन प्रमाणपत्र दिले असतांना त्यावेळेस दर्शविण्यांत आलेली वसूली दिनांकापासून ते सेवानिवृत्ती वेतन प्रकरण होईपर्यन्त वेतनातील वसूली दर्शविणे आवश्यक आहे. तरी, सदर वसूली ही तपासून कुलसचिव / प्राचार्य यांचे स्वाक्षरीसह बिनचूक असल्याचे प्रमाणपत्र सेवानिवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन प्रकरणासोबत जोडावे.

असे प्रमाणपत्र प्रकरणासोबत नसल्यास अथवा वेतनातील वसूली चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास प्रकरणासंदर्भात होणा-या विलंबास व त्याबाबत अतिप्रदान रक्कम वसूल करतांना परिगणनेबाबत भविष्यात कोणताही आक्षेप/त्रुटी निघाल्यास त्यासाठी आपले विद्यापीठ/महाविद्यालय जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. संजय जगताप)
सह संचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे-१

# प्रमाणपत्र

श्री./श्रीमती ----------------------------------------पद ----------------------विद्यापीठ/महाविद्यालय ------------
-------------------------- हे दिनांक ------------------- रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांची लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान पुणे विभाग पुणे यांनी दर्शविलेली वेतनातील अतिप्रदान वसूली विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावर तपासलेली असून सदर वसूली योग्य व अचूक असल्याची खातरजमा करण्यांत आलेली आहे. सदर अतिप्रदान वसूलीमध्ये काही तफावत आढल्यास विद्यापीठ/महाविद्यालय जबाबदार राहील.

दिनांक -

ठिकाण

कुलसचिव/प्राचार्य,